MHAK100012652022

Cri.M.A./294/2022

**Wahidullha Khan Vs. Registrar, Birth and Death, Municipal Council Patur.**

## निशाणी क्रमांक ०१ खाली आदेश

(पारीत दिनांक २३.०३.२०२३)

अर्जदाराने प्रस्तृतचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद होण्याच्या आदेशाकरिता दाखल केला आहे.

२) अर्जदाराच्या कथनानुसार त्यांची मुलगी नामे सायमा कौसर वहिदउल्लाह खान हिचा जन्म दिनांक ११.०६.१९९१ रोजी पातुर, ता.पातुर, जि. अकोला येथे झाला. अर्जदाराची मुलगी सायमा कौसर वहिदउल्लाह खान हिने स्वतः प्रतिज्ञालेख नि.क्र.१३ दाखल करुन नमुद केले की, तिचे लग्नापूर्वीचे नाव सायमा कौसर वहिदउल्लाह खान असे असुन लग्नानंतर सायमा कौसर सैय्यद तौसीफुर रहेमान असे आहे. अर्जदाराला जन्म नोंदणी संबंधी पूरेशी माहिति नसल्यामुळे तसेच अनावधानाने अर्जदाराच्या मुलीच्या जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात करण्यात आली नाही. अर्जदाराला त्यांच्या मुलीच्या शासकीय व वैयक्तीक कामाकरिता जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३) अर्जदाराने केलेला अर्ज, परिस्थिती, समोर आलेला पुरावा तसेच अर्जदाराच्या वतीने करण्यात आलेला युक्तिवाद यांचा विचार करता या प्रकरणात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत असून त्यावर सविस्तर कारणमिमांसा देवून मी खालीलप्रमाणे माझा निष्कर्ष आणि निवाडा दिला आहे–

| <u>मुद्दे</u> | | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. अर्जदार हे सिध्द करतो का की, मुलगी नामे सायमा कौसर वहिदउल्लाह खान हिचा जन्म दिनांक ११.०६.१९९१ रोजी झाला? | ... | होय. |
| २. आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दा क्रमांक १ व २ करिता</u> :—

४) अर्जदाराने त्यांच्या अर्जाच्या पृष्ठ्यर्थी त्यांची साक्ष नि.क्र.०७ वर नोंदविली. अर्जदाराने त्यांच्या सरतपासाच्या शपथपत्रात त्यांच्या अर्जातील मजकूराचा पुर्नउल्लेख केला आहे. अर्जदाराने मुख्य अधिकारी, नगर परिषद, पातुर यांनी दिलेले जन्माची नोंद नसल्याबाबत जन्म—मृत्यु नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र नि.क्र.०८ दाखल केले. अर्जदाराने त्यांचे मुलीचे लिव्हींग सर्टिफिकेट व आधारकार्ड नि.क्र.०९ व १७ दाखल केले व त्यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदाराची मुलगी नामे सायमा कौसर वहिदउल्लाह खान हिचा जन्म दिनांक ११.०६.१९९१ रोजी जन्म झाला.

५) अर्जदाराने सदर अर्जाबाबत दिनांक १०.१२.२०२२ ला प्रकाशीत दैनिक 'दर्शन' वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटिस (नि.क्र.१२) प्रसिध्द केली होती. परंतु अर्जदाराच्या अर्जास कोणीही आक्षेप केलेला नाही. गैरअर्जदाराने अर्जदाराचे मुलीच्या जन्माच्या तारखेबाबत कोणताही आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज न्यायाचे दृष्टीने मंजुर करणे योग्य राहील. म्हणून मी मुद्या क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देतो व मुद्दा क्रमांक २ चे उत्तरात खालील आदेश पारीत करीत आहे:—

## आ दे श

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. मुख्य अधिकारी, नगर परिषद, पातुर, ता.पातुर, जि.अकोला यांना आदेशीत करण्यात येते की, कलम १३(३) जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये त्यांनी सायमा कौसर वहिदउल्लाह खान हिचा जन्म दिनांक ११.०६.१९९१ रोजी झाला अशी नोंद त्यांच्याकडील जन्म–मृत्यु नोंदणी अभिलेखात घ्यावी.

३. अर्जदाराने सदर नोंद जन्म–मृत्यु अभिलेखात नोंदणी करण्यास नियमानुसार शुल्क द्यावे.

KAILAS KONDIBHAU KURANDALE
Digitally signed by KAILAS KONDIBHAU KURANDALE
Date: 2023.03.23 13:15:37 +0530

(कैलास कों. कुरंदळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पातुर

दिनांक :२३.०३.२०२३.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original .

Name of Stenographer : R. P. Khandare
Court Name : K.K.Kurandale, C.J.J.D. & J.M.F.C., Patur
Date : 23.03.2023
Signed by presiding officer on : 23.03.2023
Uploaded on : 24.03.2023